MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Publication
February 2020
Special Issue-03


28

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'स्त्री विषयक विचार'

**प्रा.डॉ. गायकवाड वाय. जे.**
प्रोफेसर, मराठी विभाग प्रमुख,
शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम. जि. उस्मानाबाद

************

**प्रस्तावना :**

विविध धर्म, समाज, संस्कृती व कलांनी भारत देश संपन्न आहे. भारतात नागवंशी, सिंधू संस्कृती फार प्राचीन आहे. सुरुवातीला सुमारे ८ हजार वर्षापूर्वी येथे मातृसत्ताक कुटुंबपध्दती होती. महिलांनी शेतीचा शोध लावला. महिला घरबांधणी, वैद्यकीय कार्य अशा अनेक क्षेत्रात प्रगतीवर होत्या. परंतु त्यानंतर भारतावर आर्यांनी चार हजार वर्षापूर्वी आक्रमण केले. सर्व मूळ भारतीय महिलांना गुलाम केले. त्यांना स्वातंत्र्य व अधिकार दिले नाहीत.

**तथागत बुध्दांचा उदय :**

आर्यांनी समाजात वर्ण व्यवस्था, जातीभेद निर्माण केले सामाजिक, आर्थिक विषमता तयार करण्यात आली. त्यामध्ये सर्व महिलांचे अधिकार व स्वातंत्र्य नाकारण्यात आले. त्या विरुध्द तथागत बुध्दांनी मानवतावादी, समतावादी, बुध्दधम्म सर्वांच्या कल्याणासाठी निर्माण केला. सर्व महिलांना व पुरुषांना कोणताही भेद न करता आपल्या बुध्द धम्मामध्ये प्रवेश दिला. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, न्याय दिला. स्त्रियांच्या महत्वाबद्दल तथागत बुध्द म्हणतात की "स्त्री जगातील महानतम विभुती आहे. कारण तिचे महत्व हे अपरिहार्य आहे. तिच्याद्वारे बोध्दीसत्व आणि विश्वाचे अन्य शासक जन्म ग्रहण करतात." त्यांनी धम्मात त्यांची मावशी महाप्रजापती, आम्रपाली, विशाखा, राणी मल्लिका गौतमी, यशोधरा इ. महिलांना भिक्खू संघात प्रवेश दिला. त्या महान भिक्खू झाल्या. बुध्दधम्म ही जात नाही तर तो एक मानवतावाद आहे. बुध्दांनी महिलांना सर्वप्रथम स्वातंत्र्य दिले. परंतु बुध्दधम्म व उपनिषद यांचे महत्व पाचशे वर्ष राहिले. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की असे असतांना देखील महिलांचे पतन का झाले? तर त्यांच्यामते बुध्द धम्म हा सर्वाचा प्रिय धम्म होत होता. बुध्द धम्माला राजाश्रय मिळाल्या मुळे उत्तरोत्तर बुध्दधम्म वाढत गेला. तेव्हा ब्राम्हणी व्यवस्थेला हादरे बसू लागले. ब्राम्हणी धर्मग्रथांनी सांगितलेले स्वर्ग—नरक या भामक समजुतीला तडेजावून बरेचसे ब्राम्हण सुध्दा बुध्दांचे अनुयायी झाले. ब्राम्हणी धर्म लयाला जावू लागला. ब्राम्हणी धर्माला कुणी जुमानीनासे झाले. त्यामुळेच ब्राम्हणी धर्म पूर्णत: मृत अवस्थेत गेला.

तेव्हा ब्राम्हणी धर्माची होणारी अधोगती थांबविण्यासाठी ब्राम्हणी धर्म पुन: प्रस्थापित करुन ब्राम्हणांचे पुनर्वसन करण्यासाठी बौध्द शासना विरुध्द पुष्यमित्र शुंगाने बंडखोरी केली. ब्राम्हणांना हाती शस्त्र घेण्याचा अधिकार नसतांना देखील ब्राम्हण पुष्यमित्रशुंगाने मौर्य सम्राट बृहदरथ यांच्या लष्करात सामील झाला आणि संधी मिळताच मौर्य सम्राट अशोक यांचा नातू सम्राट बृहदरथाची हत्या ब्राम्हण पुष्यमित्र शुंग यांनी कपट बुध्दीने भरदरबारात हत्या केली. येथूनच स्त्रियांचा सुवर्ण काळ लयास जाण्यास सुरुवात होऊन अधोगतीची एक एक पायरी खाली उतरत स्त्रियांचे स्वातंत्र्य जमिनदोस्त करण्याचे षड्यंत्र रचले गेले. त्याच काळात 'मनुस्मृती' हा रानटी कायदारुपी ग्रंथ लिहिण्यात आला. मनूने सर्व महिला व अस्पृश्यांना शूद्र व गुलाम केले. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'मनस्मृती' नावाचा ग्रंथ २५ डिसेंबर, १९२७ रोजी महाड येथे जाळून निषेध केला.

स्त्री द्वेषातून मनुस्मृतीत कपोलकल्पित जाचक अटी मांडलेल्या आहेत. बालविवाह, सतीची चाल, विधवा विवाहास विरोध, घटस्फोटास विरोध, संपत्तीतील वाटयाला विरोध, अशा एक ना अनेक जाचक अटींचे कायदे मनुने कुबुध्दीने मनुस्मृती लिहिले आहेत. पत्नीला पतीपासून घटस्फोट घेण्यास विरोध करुन स्त्रियांना पुरुष कसाही असला तरी पतीची सेवा करणारी दासी केले. एकीकडे स्त्रियांना घटस्फोट नाकारतात तर दुसऱ्या बाजूने पुरुषांना स्वैराचार करण्यास रान मोकळे केले. यानुसार पती आपल्या पत्नीची विक्री किंवा भाडयाने देऊ शकत होता. विकत घेणारा पुरुष ती स्त्री पुन्हा तिसऱ्या व्यक्तीला विकू शकत होता किंवा भाडयाने देऊ शकत होता. मात्र मूळ नवऱ्याचा अशा स्त्रीवर

आपला हक्क अबाधित ठेवू शकत होता. एकप्रकारे पतीने आपल्या पत्नीची केलेली ही घृणास्पद विटंबनाच होती. त्याचप्रमाणे स्त्रियांनी परावलंबी राहावे म्हणून स्त्रियांना पतीच्या, मुलाच्या, वडिलांच्या संपत्तीतून बेदखल केले. एवढेच नव्हेतर स्वकष्टाने मिळविलेल्या संपत्तीवर ही स्त्रियांना हक्क नाकारुन हा हक्क मुलगा आणि पती म्हणजेच पुरुषांना बहाल केला. ज्या स्त्रियांना पती निवडीचे पुर्ण स्वातंत्र्य होते त्यांना बाल विवाहाच्या अनिष्ठ आणि गलिच्छ कायद्यात बदिस्त केले. स्त्रियांना शिक्षणाचा तर सोडाच परंतु जगण्याचाही हक्क मनुस्मृतीच्या कायद्याने हिरावून घेतला.

अशा या २५०० वर्षापर्यंत अन्यायाच्या कपोळ कलिप्त गोष्टीत अडकलेल्या स्त्रियांना त्यांचा स्वाभिमान मिळवून देण्यासाठी प्रज्ञासूर्य बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाचा जन्म झाला. स्त्रीमुक्तीच्या विचार व्यवहारासंदर्भात म. फुले यांच्या क्रांतिकारी विचारांचा वसा आणि वारसा घेऊन डॉ. बाबासाहेबांनी म. फुले यांचा स्त्रिमुक्ती चळवळीचा वारसा अविरतपणे आपल्या हयातीमध्ये सातत्याने चालू ठेवला. 'अस्पृश्य मूळचे कोण होते?, रामकृष्णाचे गौडबंगाल, हिंदू—स्त्रियांची उन्नती आणि अवनती या त्यांच्या इतिहासलेखनाच्या प्रयत्नातून साकारलेल्या संहिता आहेत. स्त्री मुक्तीची वैचारिक पार्श्वभूमी या देशातील बुध्द, कबीर, फुले या तीन गुरुंच्या वैचारिकतेतून निर्माण झाली. असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विश्वास होता. स्त्री स्वातंत्र्यासाठी, स्त्री शिक्षणासाठी, स्त्रियांच्या अधिकारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेउकरांच्या नीतीचे मूळ सूत्र आहे. न्याय समाजव्यवस्था आणि तिच्यासाठी आवश्यक अशी मूलव्यवस्था त्यांच्या तत्वात सातत्याने आढळते. धर्म, परंपरा, अनिष्ट रुढी विरोधात हिंदू तत्वज्ञानांची चिकित्सा त्यांनी अनेकदा केलेली आहे.

**हिंदू कोड बिल :**

सन १९३७ साली हिंदू स्त्रियांना मालमत्ते संबंधी कायदा मंजूर झाला. परंतु कायदेपंडित, समाजसुधारक यांचे यासंबंधी समाधान झाले नाही आणि या सुधारणांच्या मागणीसाठी विविध ठिकाणी चळवळी होत राहिल्या. याचा परिणाम म्हणून इंग्रज सरकारने सन १९४१ साली 'दि हिंदू कोड कमिटी' ची नियुक्त केली. या कमिटीचे सर बी.एन. राव हे अध्यक्ष होते.

या कमिटीमुळे पुरोगामी व प्रतिगामी यात संघर्ष निर्माण झाला. एका बाजूला सुधारक तर दुसऱ्या बाजूला जीर्ण मतवादी होते. त्याचमुळे सरकारने दोहोकडून त्यांची मते मागविली. त्याच मतांच्या आधारे मसुदा तयार करण्यात आला आणि ते विधेयक सन १९४३ साली मध्यवर्ती कायदेमंडळात मांडले गेले. परंतु प्रमिगामी लोकामुळे हिंदू कायद्याचे संहितीकरण होऊ शकले नाही. परंतु या प्राप्त परिस्थितीत महानायक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सन १९४८ च्या आक्टोबर महिन्याते बिल संपूर्णपणे अभ्यासून त्यात योग्य त्या सुधारणा करुन सुधारीत हिंदू कोड बिल तयार केले. आणि प्रथमतः घटना समितीच्या विधिमंडळासमोर मान्यतेसाठी मांडले आणि याच बिलाला पुढे 'हिंदू कोड बिल' या नावाने ते ओळखले जाऊ लागले.

दिनांक ०५ फेब्रुवारी, १९५१ रोजी 'हिंदू कोड बिल' संसदेमध्ये मांडण्यात आले. या विध्येयकामुळे प्रचंड खळबळ माजली होती. एकूणच काय तर धर्मांध लोकामध्ये व त्यांच्या अविवेकी स्वभावामुळे बिलाला विरोध सुरु झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणणे होती की स्त्रियांचे हक्क, उन्नती आणि विकास हे केवळ उपदेशाने साध्य होणार नाही. त्यासाठी प्रत्यक्ष कायद्यातच तरतूद करावी लागेल. हे लक्षात घेऊन त्यांनी संसदेत 'हिंदू कोड बिल' तयार केले.

या बिलामध्ये दलित, आदिवासीच नाही तर सर्व धर्म आणि पंथातील महिलांचा विचार केला होता. हे हिंदू कोड बिल ०९ भागामध्ये आणि १३९ कलमात तसेच ०७ परिशिष्टात सामावलेले होते. हे बिल म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिला वर्गासाठी मुक्तीचा जाहिरनामाच मांडला होता. हिंदू कोड बिलामुळे हिंदू स्त्रीला विवाह घटस्फोट याबाबत पुरुषासारखाच अधिकार दिला होता. हेच बिल कांही कालावधीनंतर टप्या टप्याने मंजूर झाले. याच हिंदू कोड बिलामुळे स्त्रियांना विविध अधिकार प्राप्त होणार होते. ते पुढील प्रमाणे :—

१. स्त्रीला घटस्फोटाचा अधिकार
२. नवऱ्यांने घटस्फोट दिल्यास पोटगी मिळणार होती.
३. व्यक्तिचा विवाह कायदेशीर असल्याने दुसऱ्या विवाहास योग्य कारण नसल्यास बंदी करण्यात येऊन स्त्रियांना स्थैर्य मिळणार होते.
४. स्त्रियांना दत्तक घेण्याचा अधिकार मिळणार होता.

५. मुलांप्रमाणेच मुलीला दत्तक जाण्याचा अधिकार मिळणार होता.

६. स्त्रियांचा स्वत:च्या मिळकतीवर स्वत:चा अधिकार मिळणार होता.

७. वडिलांच्या मिळकतीवर मुला इतकीच समान मान्यता मिळणार होती.

८. मुलीला वारस होण्याचा अधिकार मिळणार होता.

९. आंतर जातीय विवाहास मान्यता मिळणार होती.

१०. स्त्रीला स्वत:चा वारस निश्चित करण्याचा अधिकार मिळणार होता.

अशा प्रकारच्या तरतूदी हिंदू कोड बिलात होत्या. या हिंदू कोड बिलात सर्व स्तराच्या महिलांना विकास व उन्नतीचा मार्ग होता. आपणाला आज प्रत्ययाला येत आहे की, सर्व स्तरातील महिलांच्या उध्दारासाठी कल्याणासाठी दास्यमुक्त करणारे यांचे कार्य बऱ्यापैकी यशस्वी झाले आहे. हे स्त्रीमुक्तीचे हिंदू कोड बिल हे हिंदू, बौध्द, शीख, जैन, व लिंगायत यांना लागू आहे. सदर कायदा सनातनी लोकांच्या दबावामुळे पंडित नेहरुंनी स्थगित ठेवला होता. अत्यंत परिश्रमानी तयार केलेल्या या कायद्याला नेहरुंनी स्थगिती दिल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हे सहन झाले नाही. स्त्री व मागासवर्गाच्या सर्वांगीण स्वातंत्र्यासाठी व हितासाठी ओबीसींना आरक्षण मिळावे म्हणून १९५१ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'कायदेमंत्री' या पदाचा राजीनामा दिला व त्या पदाचा त्याग केला. डॉ. बाबासाहेबांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या त्यागाची सर्व समाजाच्या महिलांनी जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

यानंतर मात्र अनेकदा या कायद्यासंदर्भात लढा उभारल्याने हा कायदा १९५५—५६ ला मंजूर झाला. आज हाच कायदा सर्व न्यायालयात अमलात येत आहे. याच कायद्याचा लाभ घेऊन न्याय मिळविणाऱ्या प्रत्येक स्त्रिवर डॉ. बाबासाहेबांचे न फिटणारे ऋण आहेत.

**महिलामध्ये स्वाभिमान जागृतीचे कार्य :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ दलितांच्या शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या, रंजल्या गांजलेल्या, बहुजन समाजाच्या उध्दाराकडेच लक्ष दिले असे नाही तर त्यांनी स्त्रियांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी आपली विद्वता, बुध्दीमत्ता व कर्तव्यशक्ती या कामी आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला.

भारतीय स्त्री ही समाजाची आधारशीला आहे. आपल्या संस्कृतीचे ते अस्सल प्रतिक आहे. नीतीमत्तेचे ते श्रध्दास्थान आहे. त्यांना पुरुषाप्रमाणे समान हक्क, समान न्याय, समान प्रतिष्ठा प्राप्त झाली पाहिजे. स्त्रीसंबंधीचे डॉ. बाबासाहेबांचे केवढे हे निस्सीम प्रेम, त्यांचा उध्दार करण्याबाबत त्यांच्या मनाची तळमळ व कळवळ होती. हे त्यांनी अखिल स्त्रियांना वेळोवेळी केलेल्या उपदेशातून दिसून येते.

**ग्रंथसंपदेतून स्त्रीमुक्तीचे आंबेडकरी तत्वज्ञान :**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मानवजातीच्या स्वातंत्र्य मुल्यांचे पाईक होते. भारतीय स्त्रियांच्या गुलामगिरीकडे ही त्यांचे लक्ष होते. सर्वकष समतेच्या स्वातंत्र्याचा विचार करणाऱ्या नेत्याला स्त्री स्वातंत्र्याचा विचार ही करावा लगणे अपरिहार्य होते. भारतीय स्त्री—शुद्रांची दयनीय, गुलामासारखी अवस्था होण्यास कारण येथील परंपरेने आलेले धर्मग्रंथ आणि त्यातील विचार हेच होते. हेच बाबासाहेबांच्या लक्षात आले होते. परिणामी डॉ. बाबासाहेबांनी मनूचे स्त्री शूद्राविषयाचे विषम ढोंगी विचार उघड केले. मनू हा स्त्री जातीचा कट्टर विरोधक आहे. कोणत्याही वर्गातील स्त्री असो. मनूला स्त्री दास्यच अभिप्रेत आहे.

थोडक्यात, अस्पृश्याबरोबर स्त्रियांची गुलामी व्यक्त करणारा त्यांचे सर्व मानवी हक्क हिरावून घेणारा, समाजाची विषम रचना निर्माण करणारा प्रातिनिधीक ग्रंथ म्हणजे 'मनुस्मृती' होय. या मनुस्मृती च्या पूर्वीचे धर्मग्रंथ ही या विचारांचे पोषण करीत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी २५ डिसेंबर, १९२७ रोजी महाड येथे मुनुस्मृतीचे दहन केले. ते केवळ एका पुस्तकाबद्दल घृणा निर्माण झाल्यामुळे नव्हे, तर जे ग्रंथ केवळ उपेक्षणिय निंदणीयच नव्हेत तर राष्ट्रहिताच्या दृष्टीने अग्नीला अर्पण करण्याच्या योग्यतेचेच आहेत. अशा सर्व स्मृतीचा व साहित्याचा प्रतिनिधीक ग्रंथ म्हणून आणि विषम अन्याय समाजरचना नष्ट करण्याचे प्रतिक म्हणूनच मनुस्मृतीचे दहन बाबासाहेबांनी केले.

'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' हा लेख डॉ. बाबासाहेबांनी लिहिलेल्या स्त्रियांची भूतकालीन व वर्तमानस्थितीचे वर्ण करणारा आहे. हा लेख मुळातून वाचावा इतका महत्वाचा आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्री शिक्षणविषयक कार्याचा विचार करतांना स्त्रीयांच्या सर्वकष शोषणाविरुध्द, धार्मिक पातळीवरचा पहिला विरोध दर्शवून समाजक्रांती करणारे, स्त्री स्वातंत्र्याचे पहिले उद्‌गाते बुध्द आणि स्त्री स्वातंत्र्याचा महान प्रचारक व खंबीर पुरस्कर्ते राष्ट्रपिता जोतिराव फुले या दोन गुरुंचा आदर्श डॉ. बाबासाहेबांनी त्यांच्या स्त्री शिक्षण विषयक कार्यात निश्चितच प्रेरक ठरला आहे.

'गुलामाला गुलामगिरीची जाणीव करुन द्या म्हणजे तो बंड करुन उठेल' असे डॉ. बाबासाहेब म्हणत परंतू ते समाजासाठी शिक्षित माणसाची गरज असते. शिक्षणाशिवाय माणसाला स्वत:ची ओळख होऊ शकत नाही. शिक्षण हे मानवी जीवनात क्रांती घडवू शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री आणि एकूण दलितोध्दाराच्या कार्यात शिक्षणाचा प्रसार होणे महत्वाचे मानले होते. स्त्री शिक्षणाचे महत्व विषद करतांना म्हणतात की, मुलाप्रमाणे आपल्या मुलींनाही शिक्षण दिले पाहिजे. ज्ञान आणि विद्या या गोष्टी काही पुरुषासाठी नाहीत त्या स्त्रियांनाही आवश्यक आहेत. स्त्रीला आचरणाची एक नवी दिशा दाखविली. स्त्रीला न्यूनगंड नेमका दूर करुन स्त्री फक्त चूल—मूल सांभाळणारी पुरुषांची दासी एवढीच तिची भूमिका नसून ती एक शक्ती आहे. ती धैर्याने महामेरु जन्मास घालते. सुखदु:खाच्या पलिकडची वेदना घेऊन ती पुरुषांना घडविते. तिच्या सुप्त गुणांची पारख करुन विकासाच्या नवनव्या दिशा जर तिला प्राप्तझाल्या तर प्रत्येक क्षेत्रात तिची आगेकूच राहिल.

**समारोप :**

आरक्षण हे उपकार नसून प्रतिनिधित्व आहे. ते सर्वसामान्य महिलांना मिळायला हवे. म्हणूनच आरक्षण ही काळाची गरज आहे. असे आरक्षण मिळाल्यास खऱ्या अर्थाने महिलामधील विषमता नष्ट होईल. वंचित महिलांना देखील सत्तेत सहभाग मिळेल, वाटा मिळेल.

हिंदू कोड बिलाची अंमल बजावणी हळू हळू होत आहे. १०८ वी घटनादुरुस्ती विधेयक आज मार्गी लागल्याचेच चित्र दिसत आहे. लालकृष्ण अडवाणी व त्यांचे इतर सवंगडी तसेच कॉंग्रेसचे उत्तराधिकारी आज हातात हात घालून महिला आरक्षण विधेयकास एकमुखाने समर्थन देत आहेत. याचाच अर्थ असाकी, ७० वर्षापूर्वी प्रज्ञासुर्य कायदेपंडित, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. आंबेडकरांनी जी भूमिका मांडली होती तीच भूमिका यांना आज कळलेली दिसते आहे.

दुर्दैवाने बहुजन समाजातील स्त्रियांना आंबेडकरांच्या या प्रचंड उपकाराचा विसर पडलेला आहे. आजही बहुजन समाजातील स्त्रिया व्रतवैकल्य—कर्मकांड करतांना दिसतात. आजची स्त्री हे विसरुन जाते की विद्येची देवता 'सरस्वती' असूनही स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. शक्तीची देवता ही 'दुर्गा' असूनही त्यांना दारुडया नवऱ्याचा मार खावा लागत होता. स्त्रियांच्या या उध्दारासाठी या देवता कधीही धावून आल्या नाहीत. किंवा त्यांच्यासाठी कधीही संघर्ष केला नाही. याच स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी राष्ट्रपिता म. फुले, सा. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आयुष्यभर संघर्ष करावा लागला. तेव्हा कुठे स्त्रियांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क प्राप्त झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या संविधानातील तरतूदीमुळेच आजह स्त्रिया सुरक्षित आणि सुखी आहेत.

**संदर्भसूची :**

१. दै सम्राट, शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती विशेषांक, दिनांक १४ एप्रिल, २०१६, पृ. क्र. ६८.

२. दै सम्राट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेषांक २०१०, दि. १४ एप्रिल, २०१०, पृ. क्र. ८.

३. दै. सम्राट, शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती विशेषांक, दि. १४ एप्रिल, २०१६, पृ. क्र. ५७.

४. लोक प्रवक्ता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेषांक, सं.पा. सौ. सुनिता ते. गाडेकर, एप्रिल—मे २०१३, पृ. क्र. १५.

५. राष्ट्रहितैषी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. दिलीप गरुड, ओमसाई ब्रॉडबॅंड सर्व्हिसेस, साई चौक नवी सांगवी पुणे—२, ६ डिसेंबर, २०१६, पृ. क्र. २४, ७४.

६. महात्मा बसवेश्वर आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रा. गौतम गायकवाड, क्रिएशन्स पब्लिकेशन, औरंगाबाद, १८ एप्रिल, २०१८, पृ. क्र. ७७.

७. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विद्यार्थ्यांना उपदेश मार्गदर्शन व शिक्षण विषयक विचार, भाऊ लोखंडे, सुधीर प्रकाशन वर्धा, ६ डिसेंबर, १९९४, पृ. क्र. २४

❑❑❑



S.P. Mahavidyalaya, Bhoom BHOOM Tq. Bhoom
PRINCIPAL
S.P.Maha... Bhoom
Dist. Osmanabad